भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500

FIVE HUNDRED RUPEES

Rs. 500

पांच सौ रुपए

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

B 059305

एम. पी. डहाके मुद्रांक विक्रेता प.क्र. १३/१४/२००० हॉटेल गॅलक्सी, ... यवतमाळ

500/-

अनुक्रमांक 9269 21 DEC 2013

नाव घनश्याम नंदलालजी बागडी रा. यवतमाळ

| य व म-२ |
|---|
| 3260/2013 |
| 9195 |

Joint Sub-Registrar, Yavatmal NO.2 YAVATMAL सह दुय्यम निबंधक यवतमाळ क्र. २

मुद्रांक शुल्क रूपये ५००/-

# भागीदारी लेख

हा भागीदारी लेख आज दिनांक २१.१२.२०१३ रोजी खालील व्यक्ती मध्ये करण्यात येत आहे.

१) श्री.घनश्याम नंदलाल बागडी वय अं.५३ वर्ष रा.यवतमाळ (यापुढे या व्यक्तीस " भागीदार नंबर १ " म्हणुन संबोधण्यात येईल)

२) सौ.अल्का घनश्याम बागडी वय अं.४९ वर्ष रा.यवतमाळ (यापुढे या व्यक्तीस " भागीदार नंबर २ " म्हणुन संबोधण्यात येईल)

३) श्री.अभिषेक घनश्याम बागडी वय अं.२७ वर्ष रा.यवतमाळ (यापुढे या व्यक्तीस " भागीदार नंबर ३ " म्हणुन संबोधण्यात येईल)

आणी

४) श्री.अभिजीत घनश्याम बागडी वय अं.२५ वर्ष रा.यवतमाळ (यापुढे या व्यक्तीस " भागीदार नंबर ४ " म्हणुन संबोधण्यात येईल)

Scanned by CamScanner

| |
|---|
| य द म-२ |
| ३२८०/२०९३ |
| ३१९८ |



ज्याअर्थी वरील सर्व भागीदार एकत्रित आले व त्यांनी संयुक्तपणे भागीदारीत ''मे. श्री बालाजी रिचलँड प्रमोटर्स'' या नांवानी यवतमाळ, ता. व जि. यवतमाळ येथे आज दि. ०१/०६/२००७ पासून आपसात करार करुन सर्व प्रकारचे शेत जमीन खरेदी-विक्री शेत जमीनीचे ले-आऊट करुन प्लॉटमध्ये रुपांतर करणे, बिल्डींग कन्स्ट्रक्शन, फ्लॅट खरेदी-विक्री, प्लॉट खरेदी-विक्री, बिल्डर्स, डेव्हलपर्स, प्रमोटर्स, कॉन्ट्रक्टर्स तसेच इस्टेट एजन्ट इत्यादींचा व इतर तत्सम स्वरुपाचा धंदा प्रारंभ केलेला आहे.

आणि ज्याअर्थी भागीदारांचे अधिकार व जबाबदारी निश्चित करण्याकरिता आणि पुढे भागीदारांमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद विवाद निर्माण होऊ नये या करीता हे लेखी भागीदारी पत्र बनविणे उपयुक्त व जरुरीचे आहे.

आणि त्याअर्थी हे भागीदारी पत्र भागीदारांमध्ये आपसी करार करुन खालील शर्ती व अटींनुसार बनविण्यात येत आहे.

१) प्रारंभ :- सदर भागीदारी पेढी ही आज दि. ०१/०६/२००७ पासून अस्तित्वात आल्यामुळे ती आज दि. ०१/०६/२००७ पासून अंमलात आलेली आहे.

२) पेढीचे नांव :- सदर पेढीचे नांव ''मे. श्री बालाजी रिचलँड प्रमोटर्स''असे राहील. परंतु भागीदार परस्पर संमतीने दुसऱ्या कोणत्याही नावाखाली पेढीचा धंदा चालवू शकतील.

३) धंद्याचे ठिकाण :- सदर पेढीच्या धंद्याचे मुख्य ठिकाण यवतमाळ, ता. व जि. यवतमाळ येथे राहील. परंतु भागीदार परस्पर संमतीने पेढीच्या धंद्याचे ठिकाण इतरत्र बदलवू शकतील, पेढीच्या शाखा उघडू शकतील किंवा विस्तार करु शकतील.

४) धंद्याचा प्रकार :- सदर पेढीचा धंदा मुख्यतः सर्व प्रकारचे शेत जमीन खरेदी-विक्री, शेत जमीनीचे ले-आऊट करुन प्लॉटमध्ये रुपांतर करणे, बिल्डींग कन्स्ट्रक्शन, फ्लॅट खरेदी-विक्री, प्लॉट खरेदी-विक्री, बिल्डर्स, डेव्हलपर्स, प्रमोटर्स, कॉन्ट्रक्टर्स तसेच इस्टेट एजन्ट इत्यादींचा व इतर तत्सम स्वरुपाचा धंदा राहील.

५) भांडवल :- सदर भागीदारी पेढीत सर्व भागीदारांचे मिळून एकूण रु. ५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) भांडवल राहील.

जर पेढीच्या धंद्यासाठी अधिक भांडवलाची गरज भासली तर भागीदार बँकेतून, बाजारातून, स्वतःहून किंवा इतर कोणत्याही मार्गानी एकमेकांच्या संमतीने कर्ज घेऊ शकतील.

६) व्याज :- सदर पेढीतील सर्व भागीदारांना त्यांच्या भांडवल खात्यात चालू खात्यात, कर्ज खात्यात किंवा इतर कोणत्याही खात्यात जमा असलेल्या कोणत्याही प्रकारच्या रकमेवर आयकर कायदा १९६१ च्या कलम ४० (बी) (४) च्या तरतुदीनुसार किंवा त्यात झालेल्या कायदेशीर दुरुस्ती प्रमाणे किंवा नविन करण्यात आलेला कायदा त्यावेळी अमलात असेल तर त्याप्रमाणे व्याज घेण्याचा अधिकार राहील.

तथापी पेढीचे एकूण व्यवहार लक्षात घेता भागीदारांना कमी दराने किंवा व्याज न घेण्यासंबंधी करार करता येईल.

Bagadi

Bagadi

Bagadi

परंतु पेढीच्या धद्यात नफा नसल्यास किंवा नुकसानी आल्यास भागीदारांना कोणत्याही प्रकारचे व्याज घेण्याचा अधिकार राहणार नाही.

७) <u>उचल</u> :- सर्व भागीदार त्यांच्या वैयक्तिक खर्चाकरिता ठराविक व वाजवी प्रमाणात उचल करू शकतील व अशा प्रकारे केलेली उचल त्यांच्या वैयक्तिक खात्यात नांवे माडण्यात येईल.

८) <u>नफा/नुकसानीत हिस्सा</u> :- सदर पेढीच्या नफा/नुकसानीकरीता सर्व भागीदार ''खालील प्रमाणात'' हक्कदार व जबाबदार राहतील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. घनश्याम नंदलाल बागडी | - | ३० % |
| २) | सौ. अल्का घनश्याम बागडी | - | ३० % |
| ३) | श्री. अभिषेक घनश्याम बागडी | - | २० % |
| ४) | श्री. अभिजीत घनश्याम बागडी | - | २० % |

यवमु-२
3200/2013
५/१८

९) <u>बँकेचे व्यवहार</u> :- सदर पेढीचे खाते कोणत्याही बँकेत पेढीच्या नावानी भागीदारांच्या परस्पर संमतीने उघडता येईल. बँकेतील खाते व त्या संबंधी सर्व व्यवहार वरीलपैकी कोणत्याही एका भागीदाराच्या सहीने होईल किंवा सर्व भागीदारांच्या संमतीने बँकेला दिलेल्या सुचनेनुसार होईल असे सर्व भागीदारांनी आपसात ठरविले आहे.

१०) <u>पेढीचे अस्तित्व</u> :- सदर भागीदारी ही 'स्वैच्छिक' भागीदारी आहे. भागीदार परस्पर संमतीने पेढीचे विसर्जन केव्हाही करु शकतील.

जर एखाद्या भागीदारास भागीदारीतून निवृत्त व्हावयांचे असल्यास त्यास दुसऱ्या भागीदारास एक महिन्याची पूर्व सुचना द्यावी लागेल व ही मुदत संपल्यानंतर पेढीचे वहिखाते बंद करण्यात येईल आणि तदनंतर अशा भागीदारास निवृत्त होता येईल.

मृत/निवृत्त किंवा बाहेर काढलेल्या भागीदारास त्यांचे जमा असलेले भांडवल, नफा सहीत तसेच नुकसान झाले असल्यास कपात सहीत भांडवल देता येईल. ही बाब पेढीच्या तेव्हाच्या परिस्थितीवर अवलबून राहील.

वरील परिस्थितीत ही भागीदारी पेढी आपोआप विसर्जीत होणार नाही व उरलेल्या भागीदारास स्वतंत्रपणे किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्ती समवेत भागीदारी पेढीचा धंदा पुढे चालविता येईल.

सदर पेढीचा कोणताही भागीदार मरण पावल्यास, वेडा झाल्यास, किंवा नादार झाल्यास ही भागीदारी पेढी विसर्जीत होणार नाही व उरलेल्या भागीदारास स्वतंत्रपणे किंवा इतर कोणत्याही व्यक्ती समवेत पेढीचा धंदा पुढे चालविता येईल.

११) <u>वहीखाते/वर्ष</u> :- सदर पेढीचे वहीखाते हे 'आर्थिक वर्षप्रमाणे' ठेवण्यात येईल. दरवर्षी ३१ मार्चला वहीखाते बंद करुन नफा/नुकसान काढून खंड क्रमांक ८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे भागीदारामध्ये वाटण्यात येईल.

१२) <u>कार्यकारी भागीदारांना देण्यात येणारा पगार/कमीशन/मोबदला/बोनस इत्यादी</u> :- सदर पेढीतील वरीलपैकी भागीदार नं. १, भागीदार नं. ३ व भागीदार नं. ४ हे ''कार्यकारी भागीदार'' (वर्कींग पार्टनर) राहतील व प्रत्यक्षपणे कार्यरत (एक्टीवली एंगेज्ड) राहून पेढीच्या धंद्यात आपला वेळ व लक्ष खर्ची घालतील.

The Seal of the Joint Sub-Registrar, Yavatmal
सह दुय्यम निबंधक यवतमाळ क्र. २
NO.2 YAVATMAL

Bagadi
Bagadi
Bagadi

(8)

कार्यकारी भागीदारांना त्यांच्या कार्याच्या मोबदल्यात आजपासून म्हणजेच दिनांक ०१/०६/२००७ पासून पेढीकडून आपला पगार, कमीशन इत्यादी घेण्याचा अधिकार राहील.

वरीलप्रमाणे देण्यात येणारा पगार, कमीशन, बोनस इत्यादी 'इन्कम टॅक्स ॲक्ट १९६१' च्या कलम ४० (बी)(५) च्या तरतुदींनुसार किंवा त्यात झालेल्या कायदेशिर दुरुस्तीप्रमाणे किंवा नवीन करण्यात आलेला कायदा त्यावेळी अंमलात असेल तर त्याप्रमाणे देण्यात येईल असे सर्व भागीदारांनी आपसात ठरविले आहे.

वरीलप्रमाणे देण्यात येणारा पगार, कमीशन, बोनस इत्यादी हिशोबी वर्षाच्या शेवटच्या दिवशी देय झाला असे समजण्यात येईल. कार्यकारी भागीदारांना देण्यात येणारे पगार खाली प्रमाणे ठरविण्यात येईल व वर्षे अखेरीस सर्व कार्यकारी भागीदारांना 'खालील प्रमाणात' वाटण्यात येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. घनश्याम नंदलाल बागडी | - | ५० % |
| २) | श्री. अभिषेक घनश्याम बागडी | - | २५ % |
| ३) | श्री. अभिजीत घनश्याम बागडी | - | २५ % |

ख व म-२
3260/2013
6/95

| | | |
|---|---|---|
| अ) | वार्षिक पुस्तकी नफा रु. ७५,०००/- पर्यंत असल्यास पुढीलप्रमाणे (१) किंवा (२) जे लागू असेल त्याप्रमाणे | १) जर पुस्तकी नफा रु. ५०,०००/- पर्यंत असेल तर पुस्तकी नफ्याच्या १००%<br>२) जर पुस्तकी नफा रु. ५०,०००/- च्या वर असेल तर रु. ५०,०००/- अथवा पुस्तकी नफ्याच्या ९०% त्या पैकी जी रक्कम जास्त असेल ती. |
| ब) | वार्षिक पुस्तकी नफ्याच्या रु. ७५,०००/- पेक्षा जास्त परंतु १,५०,०००/- पेक्षा जास्त नाही अशा रकमेवर | रु. ७५,०००/- वरील पुस्तकी नफ्याच्या ६०% |
| क) | वार्षिक पुस्तकी नफ्याच्या रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त रकमेवर | रु. १,५०,०००/- वरील पुस्तकी नफ्याच्या ४०% |

परंतु पेढीत ज्या वर्षी 'पुस्तकी नफा' नसेल किंवा नुकसानी आल्यास त्यावर्षी कार्यकारी भागीदारांना वरील प्रमाणे आपला पगार, कमीशन, बोनस इत्यादी घेण्याचा अधिकार राहणार नाही असे सर्व भागीदारांनी आपसात ठरविले आहे.

वरीलप्रमाणे देण्यात येणारा पगार, कमीशन, बोनस इत्यादी हे पेढीत होणाऱ्या नफ्यापेक्षा जास्त देता येणार नाही.

१३ <u>भागीदारांचे अधिकार व जबाबदाऱ्या</u> :- सदर भागीदारी पेढीतील सर्व भागीदार हे " व्यवस्थापक भागीदार" राहतील. भागीदारास परस्पर संमतीने पेढीच्या कोणत्याही कार्यासाठी एजंट किंवा मुखत्यार म्हणून कोणत्याही व्यक्तिची नेमणूक करता येईल.

वरील सर्व भागीदार सदर पेढीच्या कोणत्याही व्यवहारात पेढीचे प्रतिनिधीत्व करू शकेल. त्याचप्रमाणे सर्व कायदेविषयक, सरकारी-निमसरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी संबंधीच्या कामात पेढीतर्फे भागीदार म्हणून स्वाक्षरी करू शकतील व जबाबदारपण राहतील.

Seal of the Joint Sub-Registrar Yavatmal NO.2 YAVATMAL

GB
Bagadi
Bagadi
Bagadi

Scanned by CamScanner

बयाण-२
३२८०/२०१३
८१९



कोणताही भागीदार दुसऱ्या भागीदाराच्या लेखी संमतीशिवाय भागीदार पेढीला ज्यांच्याकडून घेणे रक्कम बाकी आहे त्यांच्यासोबत समझोता करुन किंवा कमी रक्कम घेऊन त्यांना कर्जातून पूर्णपणे मुक्त करता येणार नाही.

सदर पेढीतर्फे खरेदी-विक्रीचे व्यवहार वरीलपैकी कोणत्याही एका भागीदाराच्या सहीने होईल असे सर्व भागीदारांनी आपसात ठरविले आहे व त्याकरीता सर्व भागीदारांनी संमती दिली.

१४) कोणताही भागीदार कायद्याच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन होईल असे कोणतेही कार्य करणार नाही. जर केल्यास तो एकटा व्यक्तीगतरित्या होणाऱ्या परिणामास जबाबदार राहील.

१५) वर नमूद केलेल्या करारापैकी कोणतीही अट रद्द करणे, त्यामध्ये सुधारणा करणे, वाढ करणे, इत्यादी भागीदार एकमेकांच्या संमतीने करु शकतील.

१६) या भागीदारीपत्रात ज्या ठिकाणी स्पष्टपणे नमूद केलेले असेल ते सोडून बाकी सर्व ठिकाणी भागीदार म्हणजे त्यांचे वारसदार, उत्तराधिकारी, प्रतिनिधी आदिंचा समावेश होईल.

करीता वर नमूद केलेल्या भागीदारांनी ह्या भागीदारी पत्रातील सर्व तरतुदी, शर्ती व अटी पूर्णपणे वाचून, समजून व इतरांशी सल्लामसलत करुन या भागीदारी पत्रावर आज दि. २०/१२/२०१२ रोजी यवतमाळ, ता. व जि. यवतमाळ येथे दोन साक्षीदारांसमोर स्वखुशीने सह्या केलेल्या आहे.

साक्षीदारांच्या सह्या :-

भागीदारांच्या सह्या :-

(१) [signature]

(२) P.R. [signature]



(१) [signature]
(घनश्याम नंदलालजी बागडी)



(२) [signature]
(सौ. अलका घनश्याम बागडी)



(३) [signature]
(अभिषेक घनश्याम बागडी)



(४) [signature]
(अभिजीत घनश्याम बागडी)

Joint Sub-Registrar, Yavatmal
दुय्यम निबंधक यवतमाळ क्र. २
2 YAVATMAL

Scanned by CamScanner

Summary I (GoshwaraBhag-1)

363/3290
शनिवार,21 डिसेंबर 2013 1:23 म.नं.

दस्त गोषवारा भाग-1

| | |
|---|---|
| यवम2 | ९८०१९८ |
| दस्त क्रमांक: 3290/2013 | |

दस्त क्रमांक: यवम2 /3290/2013

बाजार मुल्य: रु. 50,000/- मोबदला: रु. 00/-

भरलेले मुद्रांक शुल्क: रु.500/-

दु. नि. सह. दु. नि. यवम2 यांचे कार्यालयात

अ. क्र. 3290 वर दि.21-12-2013

रोजी 1:16 म.नं. वा. हजर केला.

पावती:3395 पावती दिनांक: 21/12/2013

सादरकरणाराचे नाव: श्री. घनश्याम नंदलाल बागडी

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 500.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 360.00 |
| डाटा एन्ट्री | रु. 20.00 |
| पृष्टांची संख्या: 18 | |

दस्त हजर करणाऱ्याची सही:

एकुण: 880.00

Joint Sub Registrar Yavatmal II

Joint Sub Registrar Yavatmal II

दस्ताचा प्रकार: पार्टनरशिप डीड

मुद्रांक शुल्क: (47-1-अ)जेथे भागिदारीतील योगदानाचा भाग नाही तेथे@ किंवा जेथे असा योगदानाचा भाग 50000/- रु. पेक्षा अधिक नाही

शिक्का क्र. 1 21 / 12 / 2013 01 : 16 : 22 PM ची वेळ: (सादरीकरण)

शिक्का क्र. 2 21 / 12 / 2013 01 : 16 : 52 PM ची वेळ: (फी)

The Seal of the Joint Sub-Registrar, Yavatmal NO.2 YAVATMAL

Scanned by CamScanner

Summary1 (दस्त गोषवारा भाग - २ )

दस्त गोषवारा भाग-2

यवम2 9595

दस्त क्रमांक:3290/2013

21/12/2013 1 23 57 PM

दस्त क्रमांक: यवम2/3290/2013

दस्ताचा प्रकार : पार्टनरशिप डीड

| अनु क्र. | पक्षकाराचे नाव व पत्ता | पक्षकाराचा प्रकार | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| 1 | नाव:श्री. घनश्याम नंदलाल बागडी<br>पत्ता:प्लॉट नं: 0, माळा नं: 0, इमारतीचे नाव: 0, ब्लॉक नं: यवतमाळ, रोड नं: 0, महाराष्ट्र, यवतमाल.<br>पॅन नंबर: | लिहून देणार<br>वय :-53<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 2 | नाव:सौ. अल्का घनश्याम बागडी<br>पत्ता:प्लॉट नं: 0, माळा नं: 0, इमारतीचे नाव: 0, ब्लॉक नं: यवतमाळ, रोड नं: 0, महाराष्ट्र, यवतमाल.<br>पॅन नंबर: | लिहून देणार<br>वय :-49<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 3 | नाव:श्री. अभिषेक घनश्याम बागडी<br>पत्ता:प्लॉट नं: 0, माळा नं: 0, इमारतीचे नाव: 0, ब्लॉक नं: यवतमाळ, रोड नं: 0, महाराष्ट्र, यवतमाल.<br>पॅन नंबर: | लिहून देणार<br>वय :-27<br>स्वाक्षरी:- |  |  |
| 4 | नाव:श्री. अभिजीत घनश्याम बागडी<br>पत्ता:प्लॉट नं: 0, माळा नं: 0, इमारतीचे नाव: 0, ब्लॉक नं: यवतमाळ, रोड नं: 0, महाराष्ट्र, यवतमाल.<br>पॅन नंबर: | लिहून देणार<br>वय :-25<br>स्वाक्षरी:- |  |  |

वरील दस्तऐवज करून देणार तथाकथीत पार्टनरशिप डीड चा दस्त ऐवज करुन दिल्याचे कबुल करतात.

शिक्का क्र.3 ची वेळ:21 / 12 / 2013 01 : 18 : 12 PM

ओळख

खालील इसम असे निवेदीत करतात की ते दस्तऐवज करुन देणा-यांना व्यक्तीशः ओळखतात, व त्यांची ओळख पटवितात

| अनु क्र. | पक्षकाराचे नाव व पत्ता | | छायाचित्र | अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| 1 | नाव:रोशन ईश्वर हुमे<br>वय:20<br>पत्ता:यवतमाळ<br>पिन कोड:445001 | स्वाक्षरी |  |  |
| 2 | नाव:दिनेश रमणीकलाल मांडवीया<br>वय:45<br>पत्ता:यवतमाळ<br>पिन कोड:445001 | स्वाक्षरी |  |  |

The Seal of the Joint Sub Registrar Yavatmal
सह दुय्यम निबंधक यवतमाळ क्र.2
NO.2 YAVATMAL

प्रमाणित करण्यात येते की, या
दस्तामध्ये एकुण 95 पाने आहेत

सह.दुय्यम निबंधक क्र.२

शिक्का क्र.4 ची वेळ:21 / 12 / 2013 01 : 18 : 58 PM

Joint Sub Registrar Yavatmal II

पुस्तक क्र. 1
अ.नं. 3290
वर नोंदला
दि.21 / 12 / 2013

सह.दुय्यम निबंधक क्र.२
यवतमाळ

3290 /2013

Know Your Rights as Registrants

1. Verify Scanned Document for correctness through thumbnail (4 pages on a side) printout after scanning.
2. Get print and mini-CD of scanned document along with original document, immediately after registration.

For feedback, please write to us at feedback.isarita@gmail.com

Scanned by CamScanner